**प्रेसनोट** **दि.०३/०५/२०१९**

# बिबवेवाडी पोलीस ठाणे पुणे शहर

## फसवणुक करणाऱ्या आरोपीस अटक

बिबवेवाडी पोलीस ठाणे गु.र.नं.२९/२०१९ भा.दं.वि.क.४२० मधील फिर्यादी नामे राजेश नरसिमन अय्यंगर वय ५१ वर्ष धंदा कन्सलटंट रा ए/२ हस्तीपुरम इंदीरानगर बिबवेवाडी पुणे यांनी त्यांना मोलकरीण हवी असल्याने त्यांनी त्यांचे मोबाईलवरुन जस्ट डाईल नं.८८८८८८८८८८ यावर फोन केला असता त्यांना यातील अटक आरोपी नामे विक्रम अतार सिंग वय ३२ वर्षे रा.पंजाब नॅशनल बॅकेजवळ मु.पो.हेलक जि.भरतपुर राज्य राजस्थान याचा मोबाईल नंबर प्राप्त झाला त्यावर फिर्यादी यांनी फोन करुन मोलकरीण हवी असल्याचे सांगितले. त्यावर आरोपी याने फिर्यादी यांचेकडुन मोलकरीण देतो असे सांगुन त्याचे आयडीबीआय बँकेचे अकाऊंटवर १४०००/- रुपये ऑनलाईन पाठविले. आरोपी याने फिर्यादी यांना मोलकरीण न देता त्यांची फसवणुक केल्याने त्याचेवर वरील प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

दाखल गुन्हयाचा तपास बिबवेवाडी पोलीस ठाणेचे महिला पोलीस उप निरीक्षक श्रीमती अलका जाधव हया पुणे शहर पोलीस दलातील सायबर सेल पोलीस ठाणेकडील अधिकारी व कर्मचारी यांचेसह समांतर तपास करीत असताना त्यांनी आरोपीचा मोबाईल नंबर व अकाऊंट नंबरचे तांत्रिक विष्लेशणावरुन तपास करुन त्याचा शिताफिने माग घेवुन त्यास दि.०२/०५/२०१९ रोजी अटक करण्यात आलेली आहे.

तसेच आरोपी विक्रम अतर सिंग वय ३२ वर्षे रा.पंजाब नॅशनल बॅकेजवळ मु.पो.हेलक जि.भरतपुर राज्य राजस्थान याचेवर त्याचे बँक अकाऊंटवरुन किंवा मोबाईल नंबर वरुन फसवणुक होवुन अशा प्रकारचे गुन्हे दाखल असल्यास बिबवेवाडी पोलीस ठाणेस संपर्क करावा तपासी अंमलदार महिला पोलीस उप निरीक्षक श्रीमती अलका जाधव बिबवेवाडी पोलीस ठाणे पुणे शहर मो.नं.**९८२१९०५३४८** व बिबवेवाडी पोलीस ठाणे **०२०-२४२८२००३**

सदरची कामगिरी वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री मुरलीधर करपे यांचे मार्गदर्शना खाली महिला पोलीस उप निरीक्षक श्रीमती जाधव,पोलीस हवालदार चिप्पा, पोलीस शिपाई पुजारी, मोरे ,कुलकर्णी, शिंदे व सायबर सेल पोलीस ठाणेकडील पोलीस निरीक्षक श्रीमती राधीका फडके सपोनि श्री पानबंद व पोलीस उप निरीक्षक पडवळ तसेच पोलीस शिपाई हांडाळ, गावडे यांनी केली आहे.